महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित.**
एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॉन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला,
लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९,दूरध्वनी क्र.०२२-६९४२५०००,
ईमेल: agmhrrc@mahagenco.in वेबसाईट : www.mahageco.in

क्र.महानिर्मिती/तंत्रज्ञ-३/मासं-से.प्र./का.टि.क्र.५१९/ № 09783 दिनांक: 4 NOV 2025.

## सूचना

**विषय:** महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ अन्वये तंत्रज्ञ-३ या पदाकरिता कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून प्रसिध्द यादीच्या अनुषंगाने प्राप्त निवेदने आणि पात्र ठरलेल्या उमेदवारांची कागदपत्रे जमा करण्याची प्रक्रिया राबविण्याबाबत.

**संदर्भ:** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४
२) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.१२११० दि.२८.११.२०२४
३) महानिर्मिती सूचना क्र.५३ दि.०३.०१.२०२५
४) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.१९१ दि.०७.०१.२०२५
५) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.८९२ दि.२९.०१.२०२५
६) महानिर्मिती सूचना क्र.३४७१ दि.२२.०४.२०२५
७) महानिर्मिती सूचना क्र.९५०१ दि.२४.१०.२०२५

------------------------

महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र.०४/२०२४ अंतर्गत तंत्रज्ञ-३ या पदांकरीता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि.०८, ०९, १० व १५.०५.२०२५ रोजी ऑनलाईन परीक्षा पार पाडण्यात आली होती. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.०७ अन्वये तंत्रज्ञ-३ या पदाकरीता उमेदवारांना लागू असणाऱ्या जाहिरातीतील विविध अटी व शर्तींच्या अनुषंगाने कागदपत्रे पडताळणी करिता १:२ या प्रमाणात कागदपत्रे जमा करण्याची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तंत्रज्ञ-३ या पदी उमेदवारांची कागदपत्रे पडताळणीकरीता, ती जमा करण्याची प्रक्रिया महानिर्मिती कंपनीच्या मुख्य कार्यालय तसेच विविध क्षेत्रीय कार्यालये येथे राबविण्यात येणार आहे.

ऑनलाईन परीक्षेनंतर जाहिरातीत प्रसिध्द पदांसमोर १:२ या प्रमाणात कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संदर्भिय क्र.०७ वरील सूचनेनुसार प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरील सूचनेत उमेदवारांना काही आक्षेप / निवेदने सादर करावयाची असल्यास ०७ दिवसांच्या आत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त निवेदनांचा विचार करता, उमेदवारांच्या माहितीसाठी पुढील बाबी स्पष्ट करण्यात येत आहेत:-

१) ऑनलाईन परीक्षेस उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांचे गुण अंतिम निवड / प्रतिक्षा यादीसोबत प्रसिध्द करण्यात येतील.

२) अनाथ (Orphan) या समांतर आरक्षणातून निवड होणाऱ्या उमेदवारांसाठी, सदरील उमेदवारांची निवड ज्या प्रवर्गातून होईल, त्या प्रवर्गासाठी लागू असलेली किमान गुणांची अट (खुला प्रवर्ग-३०%, मागास प्रवर्ग-२०%) संबंधित उमेदवारांस लागू असेल.

३) कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्यास पात्र ठरलेल्या ज्या उमेदवारांकडे ऑनलाईन अर्जाची प्रत उपलब्ध नाही, अशा उमेदवारांच्या विनंतीनुसार संबंधित बाहयस्त्रोत संस्थेकडून ऑनलाईन अर्जाची प्रत प्राप्त करून उमेदवारास पुरविण्यात येईल.

४) १:२ या प्रमाणात यादी तयार करताना मुळ महानिर्मिती बी.टी.आर.आय. आरक्षणातून (महानिर्मिती प्रकल्पग्रस्त) ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा विचार त्यांच्या प्रशिक्षणाच्या कालावधीनुसारच (म्हणजेच ०५ वर्षे व पुढील आणि ०१ ते ०४ वर्षे प्रशिक्षण पूर्ण केलेले) केला असल्याने, काही बी.टी.आर.आय. उमेदवारांचा समावेश संदर्भिय क्र.०७ अन्वये प्रसिध्द यादीत नव्हता. या प्रकरणी प्राप्त निवेदने आणि उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात सादर केलेली माहिती यांची पडताळणी करण्याबात संबंधित बाह्यस्त्रोत भरती संस्थेस विनंती केली असता, संबंधित बाहयस्त्रोत भरती संस्थेकडून अतिरिक्त उमेदवारांची यादी प्राप्त झाली आहे. करीता, खालील रकान्यात महानिर्मिती पात्र प्रकल्पग्रस्त मुळ बी.टी.आर.आय. प्रवर्गातून अर्ज सादर केलेले परंतु यापूर्वीच्या यादीमध्ये समावेश नसलेल्या अतिरिक्त उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता बोलविण्यात येत आहे.

**महानिर्मिती पात्र प्रकल्पग्रस्त बी.टी.आर.आय.आरक्षणातंर्गत अतिरिक्त उमेदवारांची यादी** ↵

५) संबंधित भरती संस्थेकडून ऑनलाईन परीक्षेसंबंधी प्राप्त अहवालानुसार असे निदर्शनास आले आहे की, काही उमेदवार हे ऑनलाईन परीक्षेत एकापेक्षा जास्त वेळा उपस्थित होते. अशा प्रकरणी संबंधित उमेदवारांनी गैरफायदा घेतला असल्याने, संबंधित उमेदवार ज्या सत्राकरीता पहिल्यांदा उपस्थित होते, अशा सत्राचेच गुण वैध मानून त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

६) कागदपत्रे पडताळणीअंती यापूर्वीच्या यादीतील आणि सध्याच्या अतिरिक्त यादीतील पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचा एकत्रित विचार करुन जाहिरातीत नमूद तरतुदी व गुणानुक्रमे अंतिम निवड यादी / प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी. तसेच यापूर्वी जाहिरातीत नमूद तरतूदी व वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या सूचनेतील तरतूदी अबाधीत राहतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तंत्रज्ञ-३ पदासाठी कागदपत्रे पडताळणीकरीता, ती जमा करण्याची प्रक्रिया महानिर्मिती कंपनीच्या मुख्य कार्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालय येथे तुकडीनिहाय पार पाडण्यात येणार आहे. करीता, उमेदवारांनी तुकडीनिहाय यादी प्राप्त करुन घेण्याकरीता खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**"तंत्रज्ञ-३" पदाच्या कागदपत्रे जमा करण्याकरीता दि. १७.११.२०२५ ते दि. २५.११.२०२५ रोजीच्या तुकडीनिहाय याद्या.** ↵

वरील प्रक्रिया ही खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे, याची उमेदवारांनी आणि कागदपत्रे पडताळणी अधिकाऱ्यांनी विशेष नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती** :-

१) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात वैधता, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण इत्यादी माहिती सादर करु न शकल्यास सदरील उमेदवारास अपात्र घोषित करण्यात येईल.

२) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ अन्वये उमेदवारांना सूचित केल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेदरम्यान सादर करणे बंधनकारक राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरीता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे पडताळणी / छाननी न करता बोलविण्यात आले होते. त्यानुसार आता, उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव,वय,जात,उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित दिव्यंगत्वाचे प्रमाण इत्यादी बाबत सादर केलेल्या मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल.

४) मागासप्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या महिला उमेदवारांनी (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती हे प्रवर्ग वगळून) लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.१०.०२.२०२५) अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दि.१७.११.२०२५ ते दि. २५.११.२०२५ रोजी पर्यंत प्राप्त केलेली व वैध असणे आवश्यक आहे. तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातून महिला आरक्षणातर्गंत निवड झालेल्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

५) ज्या उमेदवारांनी इमाव, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड व विमाप्र या प्रवर्गातून ऑनलाईन अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी त्यांना लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.१०.०२.२०२५) अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दि.१७.११.२०२५ ते दि. २५.११.२०२५ रोजी पर्यंत प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे.

६) ज्या उमेदवारांनी आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातून ऑनलाईन अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी त्यांना लागू असलेले विहीत प्रमाणपत्र, जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.१०.०२.२०२५) अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दि.१७.११.२०२५ ते दि. २५.११.२०२५ रोजी पर्यंत प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे.

७) आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन निर्णय दि.१२.०२.२०१९ तसेच त्यानंतर वेळोवेळी शासनाने पारीत केलेले शासन निर्णय/ परिपत्रकांच्या अनुषंगाने मिळकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरील उमेदवारांनी शासन निर्णयात नमूद मिळकतीच्या प्रमाणपत्रात चुकीची/ दिशाभूल करणारी माहिती सादर करुन

मिळकत प्रमाणपत्र प्राप्त केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांना भरतीतील कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल व सदरील उमेदवारांवर योग्य ती कारवाही करण्यात येईल,याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी. तसेच आ.दु.घ.प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांचे महाराष्ट्र राज्यासाठी लागू असलेले आ.दु.घ.प्रमाणपत्र विचारात घेण्यात येईल.

८) तसेच कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याच्या प्रक्रियेदरम्यान सादर केलेले गुणवत्ताधारक खेळाडू प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भूकंपग्रस्त प्रमाणपत्र हे संबंधित विभागामार्फत पडताळणी केल्यानंतर त्यानुसार पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र निर्गमित करण्यात येईल.

९) खेळाडू आरक्षणाअंतर्गत (SP) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्रे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१.०७.२०१६, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो.२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक १८.०८.२०१६, तसेच शासन शुध्दिपत्रक क्र.राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८ क्रीयुसे-२ दिनांक ११.०३.२०१९ व शासन शुध्दिपत्रक क्र.राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८ क्रीयुसे-२ दिनांक २४.१०.२०१९ तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/ क्रीयुसे-२ दिनांक ३०.०६.२०२२ व तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये संबंधीत पदांच्या निवडीकरीता वैध असल्याबाबत संबंधीत सक्षम अधिकारी यांचा वैधता अहवाल सादर करणे आवश्यक असेल. मा.सक्षम अधिकारी यांचा वैधता अहवाल उपलब्ध नसल्यास, उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही, याची संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१०) दिव्यांग प्रवर्गासाठी जाहिरातीत नमूद दिव्यांग प्रकारात मोडत असणाऱ्या उमेदवाराजवळ शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्र.अप्रक्रि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दि.१४.०९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. अशा पात्र उमेदवारांमधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि.०७.०६.२००६ अनुसार निवडीस/ नियुक्तीस पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. दिव्यांग उमेदवारांनी कायमस्वरुपी दिव्यांग (जाहिरातीत नमूद विशिष्ट दिव्यांगत्व) असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे क्रमप्राप्त आहे.

११) माजी सैनिक आरक्षणातर्गंत अर्ज केलेल्या उमेदवारांनी सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्र (Discharge Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

१२) प्रकल्पग्रस्त आरक्षणातर्गंत निवड झालेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१.०१.१९८० नुसार विहित नमून्यात प्रकल्पग्रस्तांचा प्राधान्यक्रम दाखला (प्रपत्र) सादर करणे आवश्यक राहील.

१३) अनाथ आरक्षणातर्गंत अर्ज केलेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अधिन राहून अनाथ व्यक्तीचे (संस्थात्मक/ संस्थाबाह्य) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१४) संबंधीत पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींची किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारास अपात्र घोषित करण्यात येईल अथवा उमेदवाराची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१५) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक अनुभव/ प्रशिक्षण कालावधीचे प्रमाणपत्रे/ कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता) ही जाहिरातीस अनुसरुन संबंधीत रिक्त पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.१०.०२.२०२५) प्राप्त केलेली असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे/ कागदपत्रे ही कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. तसेच उमेदवार जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता ही जाहिरातीस अनुसरुन संबंधीत पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण करीत असणे आवश्यक आहे.

१६) कागदपत्रे जमा करण्याची पात्रता यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१७) कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी वाम मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास उमेदवारास अपात्र घोषित करण्यात येईल. तसेच त्यांची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१८) कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी जे उमेदवार विहीत केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणार नाहीत, त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारचे निवेदन अथवा विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**२०) कागदपत्रे जमा करण्याकरिता उपस्थित राहताना उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेल्या अर्जाची मुळ प्रत, त्यांची मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) स्वत:जवळ बाळगावा. तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊनच उमेदवाराने कागदपत्रे जमा करण्याकरीता नमूद ठिकाणी, दिवशी व वेळेवर उपस्थित राहावे. विहीत नमूद दिनांक व वेळेवर कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.**

२१) उमेदवारांनी कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेदरम्यान ऑनलाईन अर्जात नमूद नावाचे मुळ ओळखपत्र व सत्यप्रत जसे (पॅनकार्ड,आधारकार्ड, वाहन परवाना, शासकीय ओळखपत्र,छायाचित्र असलेले पारपत्र इ.) सादर करणे बंधनकारक आहे.

२२) भुसावळ रेल्वे साईडींग, तसेच मौजे शिंदाळा येथील प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करु न शकल्यास संबंधित मुळ मालकाचे नॉमिनेशन शपथपत्र व महानिर्मिती कंपनीशी केलेली खरेदीखत/अॅग्रीमेंट (Saledeed) सादर करणे आवश्यक असेल.

२३) महानिर्मिती बाहयस्त्रोत तांत्रिक कंत्राटी कर्मचारी कोटयातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी संबंधित कंत्राटदारांचे अनुभव प्रमाणपत्र संबंधित कंत्राटदाराच्या नाममुद्रीत पत्र (Letter Head) वर असणे तसेच संबंधित विद्युत केंद्राकडुन ते पंजीकृत/सही शिक्यानिशी अधिकृत असणे आवश्यक आहे.

२४) कोराडी-CSR योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांनी कोराडी विद्युत केंद्राचे त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

तंत्रज्ञ-३ पदाकरीता दि.१७.११.२०२५ ते दि. २५.११.२०२५ दरम्यान कागदपत्रे पडताळणीकरीता, ती जमा करण्याच्या प्रक्रियेसाठी, वर नमूद केल्याप्रमाणे तुकडीनिहाय उमेदवारांना उपस्थित राहावयाचे स्थळ तसेच वेळ खालीलप्रमाणे :-

| दिनांक | वेळ | उपस्थित राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| **दि.१७.११.२०२५ ते दि. २५.११.२०२५** | **सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० पर्यंत** | महानिर्मिती, सांघिक कार्यालय, सहावा माळा, प्रकाशगड, वांद्रे मुंबई-५१. |
| | | मुख्य अभियंता यांचे कार्यालय ऊर्जाभवन, महाऔष्णिक विद्युत केंद्र, उर्जानगर चंद्रपूर, पिन-४४२४०४. |
| | | मुख्य अभियंता यांचे कार्यालय, औष्णिक विद्युत केंद्र, कोराडी, कोराडी कॉम्पलेक्स, छिंदवाडा रोड,कोराडी जि. नागपूर -४४१११११. |
| | | मुख्य अभियंता यांचे कार्यालय, औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा, जि.नागपूर-४४११०२. |
| | | मुख्य अभियंता यांचे कार्यालय, औष्णिक विद्युत केंद्र, पारस, विद्युत नगर, पारस ता.बाळापुर, जि.अकोला- ४४४१०९. |
| | | मुख्य अभियंता यांचे कार्यालय, शक्तीगड, औष्णिक विद्युत केंद्र, दिपनगर, भुसावळ, जि.जळगांव -४२५३०७. |
| | | मुख्य अभियंता यांचे कार्यालय, औष्णिक विद्युत केंद्र, परळी-वैजनाथ, जि.बीड- ४३१५२०. |
| | | मुख्य अभियंता यांचे कार्यालय, औष्णिक विद्युत केंद्र, नाशिक, एकलहरे, जि.नाशिक, -४२२१०५. |
| | | मुख्य अभियंता यांचे कार्यालय, कोयना जल विद्युत केंद्र, संकुल, पोफळी, ता.चिपळुण, जि.रत्नागिरी -४१५६०१. |
| | | अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय, नवीकरणीय ऊर्जा मंडळ, प्रकाशभवन, प्लॉट क्र.१०६, ५ वा मजला, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६. |

**(डॉ.नितीन वाघ)**
**कार्यकारी संचालक (मासं)**
**महानिर्मिती**

D:\RC_2018_DATA\2024\Advertiesment\04 2024 Technician 3\ON and Notification Tech III Document Submission.doc